**ठळक बातम्या**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी ५ वाजेपर्यंत ९० टक्के, तर तमिळनाडूमध्ये ८२ टक्क्याचं विक्रमी मतदान

महाराष्ट्रात विधानसभा पोटनिवडणुकीत बारामती मतदारसंघात ५२, तर राहुरीत ५० टक्क्यापेक्षा जास्त मतदान

सीबीएसईची इयत्ता दहावीची गुण सुधार परीक्षा १५ मे पासून

उत्तराखंडात वाहन दरीत कोसळून ८ जणांचा मृत्यू, तीन जण जखमी

**आणि**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ८५२ अंकाची घसरण

**<><><><><>**

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुसाठी आज मतदान झालं. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत बारामती मतदारसंघात साडे ५२ टक्के तर राहुरीत ५० टक्क्यापेक्षा जास्त मतदान झालं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामतीतली जागा तर शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरीची जागा रिक्त झाली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि पार्थ पवार, आमदार रोहित पवार यांनी बारामतीत मतदानाचा हक्क बजावला. राहुरीत उमेदवार अक्षय कर्डिले यांनी मतदानाचा हक्क बजावला. दोन्ही मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतमोजणी ४ मे ला होणार आहे.

तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभेसाठी आज मतदान झालं. त्याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून….

**-------व्हीसी------**

**तामिळनाडू,** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान झालं. संध्याकाळी पाच  वाजेपर्यंत तमिळनाडूमध्ये ८२ टक्क्यापेक्षा जास्त तर पश्चिम बंगाल मधे जवळपास ९० टक्के  मतदान झालं होतं.

**पश्चिम बंगाल** विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातल्या १५२ जागांवर आज मतदान झालं. राज्यात सर्वाधिक मतदान दक्षिण दिनाजपूर इथं ९३ टक्के इतकं नोंदवलं गेलं.

या टप्प्यात १ हजार ४७८ उमेदवार होते. यासाठी निमलष्करी दलांच्या २ हजार ४०० हून अधिक तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या. पश्चिम बंगालमध्ये मतदानादरम्यान काही ठिकाणी उमेदवारावर हल्ला केल्याचे तसंच ईव्हीएमशी छेडछाड केल्याचे  प्रकार समोर आले आहे. या प्रकरणी पाच जणांना अटक झाली असून निवडणूक आयोगाने आतापर्यंत ४०० तक्रारी नोंदवल्या आहेत.

**तमिळनाडू**मधल्या पश्चिमेकडल्या जिल्ह्यांमधे सर्वाधिक मतदान नोंदवलं गेलं. दुपारी चार वाजेपर्यंत भवानी, मोदक्कुरीची आणि पेरूंदुराई या जिल्ह्यांमधे ७७ टक्क्यापेक्षा जास्त मतदान झालं. नमक्कल, एरोड आणि करूर जिल्ह्यांमधे ७६ टक्के मतदान झालं. तर सालेम आणि तेनकाशी जिल्ह्यात ७५ टक्के मतदान नोंदवलं गेलं. चेन्नई जिल्ह्यामधल्या १६ मतदारसंघांपैकी सात मतदारसंघात ७० टक्के मतदान झालं.

**गुजरात**मधल्या आणंद जिल्ह्यातल्या उमरेठ विधानसभा पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान झालं.

पश्चिम बंगाल मधल्या उर्वरित मतदार संघांमधे येत्या **२९ तारखेला** मतदान होणार असून पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांची **मतमोजणी** ४ मे रोजी होईल.

**<><><><><>**

भारत टॅक्सी ही सहकारी तत्त्वावर चालणारी टॅक्सी सेवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मुंबईत सुरू होणार आहे. या उपक्रमाचे मुख्य परिचालन अधिकारी विवेक पांडे यांनी ही माहिती दिली. यासाठी चालकांच्या नोंदणीची प्रक्रीया आज मुंबईत केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत सुरू झाली. सध्या देशातल्या १० शहरांमध्ये ५० लाख ग्राहकांनी ही सेवा वापरली आहे.

<><><><><>

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या गुण सुधारणेसाठीच्या परीक्षेला १५ मे पासून सुरूवात होणार आहे. विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा विषयात कामगिरी सुधारायची असेल तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहेत. १५ एप्रिलला इयत्ता दहावीच्या नियमित परीक्षेचा निकाल जाहीर झाला.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी २६ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३३वा भाग आहे. हा संपूर्ण कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, एआयआर न्यूज संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर ॲपवर प्रसारित केला जाईल.

<><><><><>

भारत आणि दक्षिण कोरियामधील कराराची पुनर्रचना करण्यासंबंधीच्या वाटाघाटी २०२६ च्या अखेरपर्यंत किंवा जास्तीत २०२७ च्या मध्यापर्यंत पूर्ण होतील अशी अपेक्षा असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात त्यांनी समाजमाध्यमावर एक संदेशही सामायिक केला आहे. या वाटाघाटींमध्ये परस्पर हिताच्या प्रमुख क्षेत्रांवर, तसेच परस्पर व्यापारातील अडथळे दूर करण्यावर भर दिला जाईल असं त्यांनी म्हटलं आहे.

दोन्ही देशांनी परस्परांतील द्विपक्षीय व्यापार कराराच्या पलीकडे जात अधिक परस्पर हित साधणाऱ्या भागीदारीला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला असल्याचं त्यांनी या संदेशात म्हटलंय. याआधी २००९ मध्ये झालेला दोन्ही देशांमध्ये झालेला मुक्त व्यापार करार हा भारताच्या विरोधात आणि असंतुलित होता असंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज कतारचे परराष्ट्र व्यापार व्यवहार राज्यमंत्री डॉ. अहमद बिन मोहम्मद अल सय्यद यांच्याशी आज दूरदृश्य पद्धतीनं संवाद साधला. यावेळी दोन्ही देशांमधले द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक संबंध अधिक वृद्धिंगत करण्यासोबतच, पुरवठा साखळीला बळकटी देण्याच्या उपाययोजनांवर चर्चा केली गेल्याचं गोयल यांनी समाजमाध्यमावरून कळवलं आहे. येत्या काळात भारत आणि कतार मधली धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी आपण उत्सुक असल्याचंही गोयल यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

उत्तराखंडात तेहरी जिल्ह्यामध्ये एक वाहन दरीत कोसळून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले आहेत. चंबा पोलीस स्टेशनाच्या हद्दीतल्या चंबा कोटी मार्गावर हा अपघात घडला. एसडीआरएफ आणि पोलिसांची पथकं घटनास्थळी दाखल झाली असून बचाव आणि मदत कार्य सुरू आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून जखमींच्या प्रकृतीविषयी कामना केली आहे.

<><><><><>

कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किंमती, इराण-अमेरिकेदरम्यान थांबलेल्या चर्चा

यामुळं आज सलग दुसऱ्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ८५२ अंकाची घसरण झाली आणि तो ७७ हजार ६६४ अंकावर बंद झाला. निफ्टीही २०५ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार १७३ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

फ्रान्समधल्या विमानतळावरुन प्रवास करणाऱ्या भारतीय प्रवाशांना आवश्यक प्रवासी व्हिसाची अट शिथिल करायचा निर्णय फ्रान्स सरकारनं घेतला आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इम्यॅन्युल मॅक्रॉन यांच्या फेब्रुवारीत झालेल्या भारत भेटीदरम्यान यावर सहमती झाली होती. फ्रान्स सरकारच्या निर्णयाचं भारतानं स्वागत केलं आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात होर्मुझच्या सामुद्रधुनीत भारताच्या कुठल्याही जहाजावर हल्ले झालेले नाहीत, इतर देशांच्या जहाजांवर हल्ले झाल्याची माहिती केंद्रीय बंदरे, जलमार्ग आणि नौकानयन खात्याचे अतिरीक्त सचिव मुकेश मंगल यांनी दिली. या मार्गाने जाणाऱ्या सर्व भारतीय जहाजांवरचे कर्मचारी सुरक्षित असल्याचं नवी दिल्लीतल्या वार्ताहर परिषदेत ते आज म्हणाले. युद्ध झाल्यापासून पश्चिम आशियातून १२ लाखांहून अधिक प्रवासी भारतात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे आखाती विभागाचे अतिरीक्त सचिव असीम महाजन म्हणाले.

<><><><><>

इराणचं कच्चं तेल वाहून नेत असलेलं आणखी एक जहाज आज ताब्यात घेतल्याचा दावा अमेरिकेच्या लष्करानं केला आहे. अमेरिकेनं हिंद महासागरातून हे जहाज ताब्यात घेतलं. या जहाजावर गयानाचा ध्वज होता आणि ते चीनमधील्या झौशानच्या दिशेनं जात होतं.

दरम्यान हॉर्मुझच्या समुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांकडून पहिल्यांदाच प्रवास शुल्क वसूल केल्याचं इराणनं जाहीर केलं आहे. अमेरिका आणि इस्त्रायलनं केलेल्या लष्करी कारवायांमुळे झालेल्या आपल्या आर्थिक नुकसानीची भरपाई म्हणून हे शुल्क आकारलं जात असल्याचा दावा इराणनं केला. इराणनं अधिकृतपणे शुल्काची रक्कम जाहीर केलेली नसली, तरी मोठ्या तेलवाहू जहाजांकडून प्रत्येक फेरीपोटी १० लाख डॉलर्सपर्यंत शुल्क द्यावं लागत असल्याची शक्यता या क्षेत्रातल्या तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान इराणची ही कृती म्हणजे आंतरराष्ट्रीय सागरी कायद्याचं उल्लंघन असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

होर्मुझच्या सामुद्रधुनीत मार्ग अडवणाऱ्या इराणच्या बोटींवर गोळीबार करण्याचे आदेश अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या सैन्याला दिले आहेत. या महत्त्वाच्या जलमार्गात अमेरिकेचं लष्कर सुरुंग हटवण्याचं काम करत असल्याचं ट्रम्प समाज माध्यमावर म्हणाले. सुरुंग पेरणाऱ्या कुठल्याही बोटीवरच्या कर्मचाऱ्यांना गोळ्या घालण्याचे आदेश दिले असून सुरुंग शोधणारी जहाजं सध्या सामुद्रधुनीत शोध घेत असल्याचं ट्रम्प म्हणाले.

<><><><><>

डेन्मार्कमधे हॉर्सन्स इथं उद्यापासून थॉमस आणि उबेर चषक बॅडमिंटन स्पर्धेतला सुरुवात होईल. भारताचा महिला आणि पुरुष संघ या स्पर्धेत सहभागी झाला आहे. भारताच्या पुरुष संघाचा सलामीचा सामना कॅनडाविरुद्ध होईल. त्यानंतर सोमवारी ऑस्ट्रेलिया आणि बुधवारी चीनविरुद्ध भारताचे सामने होणार आहेत. चार वर्षांपूर्वी भारताच्या पुरुष संघानं या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं होतं. महिलांच्या संघाचा सलामीचा सामना उद्या डेन्मार्कसोबत होणार आहे. त्यानंतर

शनिवारी युक्रेनसोबत आणि सोमवारी चीनसोबत भारताचे सामने होतील. भारताच्या महिला संघाचं नेतृत्व पी. व्ही. सिंधू हिच्याकडे असेल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात मुंबईत वानखेडे मैदानावर सामना सुरू आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या ७ षटकात २ बाद ८३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

इजिप्तमध्ये कैरो इथे सुरू असलेल्या आय एस एस एफ कनिष्ठ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या नेमबाजांनी आज एक सुवर्ण आणि एका कास्य पदकाची कमाई केली. महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात प्राची गायकवाड हिने सुवर्णपदक पटकावलं. तर पुरुषांच्या गटात नरेन प्रणवने १० मीटर एअर रायफल प्रकारात कास्यपदक पटकावलं. या स्पर्धेत दोन सुवर्ण, चार रौप्य आणि तीन कांस्य पदकांसह भारत पदक तालिकेत आघाडीवर आहे.

**//<><><><><>//**